माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००१५२

अपिलार्थी श्री. सुजित मधु होलमागी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय आवार,
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई-०१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्या-१)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय आवार,
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई-०१

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
२४.०९.२०२५	२०.१०.२०२५	२८.१०.२०२५	१८.११.२०२५

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २०.१०.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १८.११.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २४.०९.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. ०१.०७.२०२५ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत पोलीस उपायुक्त, मुख्यालय- १ यांनी निर्गमित केलेले कारणे दाखवा नोटीस व त्यावर पारित केलेले कार्यदेशाची मागणी केलेली होती.

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१०.२०२५ रोजी दि. १७.१०.२०२५ रोजीचे पत्र संलग्न करुन अपिलार्थींना कळविले की, मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(त्र) अन्वये माहिती नाकारण्यात येत आहे.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २८.१०.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.११.२०२५ रोजी विचारलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराशी सहमती दर्शवून प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

..२/-

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.१३.१०.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींनी विभिन्न हॉटेल्स व रेस्टॉरंट यांना देण्यात आलेले कारणे दाखवा नोटीस व त्यावर झालेले आदेशांची मागणी केली. त्याअनुषंगाने सर्व संबंधीत हॉटेल्स व रेस्टॉरंट यांना दि.०९.१०.२०२५ रोजी विचारणा करण्यात आली की, त्यांची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही. प्रत्येक आस्थापनांनी कळविले की, त्यांच्याशी संबंधीत माहिती देण्यास हरकत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१०.२०२५ रोजी कळविले की, मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(त्र) अन्वये देता येणार नाही. तसेच, प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील निकाली काढलेले आहे.

६. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

15-10-2026

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई